वाचा :-

१. केंद्रिय आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, दि. २३ डिसेंबर, २००५
२. शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन परिपत्रक क्रं. संकिर्ण २०१९/प्र.क्रं. १९९/ एस.डी. २ दिनांक ०२/०८/२०१९
३. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची बैठक दिनांक १३.०७.२०२२

---

**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**
**(गृह शाखा)**
**क्रं. पगस/कावि/ 582 /२०२२**
**दिनांक : १३/०७/२०२२**

विषय : **पुणे जिल्ह्यातील इयत्ता १२ वी पर्यंतच्या (प्री स्कुल, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक) सर्व शाळांना सुट्टी जाहीर करणेबाबत**
**(इंदापूर, बारामती, दौंड, शिरूर व पुरंदर हे तालुके वगळून)**

**आदेश**

**ज्याअर्थी,** प्रादेशिक हवामान अंदाज केंद्र, पुणे यांचेकडील संदेशान्वये दिनांक १४/०७/२०२२ व दिनांक १५/०७/२०२२ या कालावधीत महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये होणाऱ्या अतिवृष्टीमुळे रेड अलर्टचा इशारा दिला आहे.

**ज्याअर्थी,** पुणे जिल्ह्यात झालेली व होणारी अतिवृष्टी पाहता सदर अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये तसेच अतिवृष्टीमुळे आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली असलेने त्याचा परिणाम शालेय विद्यार्थी यांना होवू नये याकरीता पुणे जिल्ह्यातील (इंदापूर, बारामती, दौंड, शिरूर व पुरंदर हे तालुके वगळून) इतर सर्व तालुक्यातील इयत्ता १२ वी पर्यंतच्या (प्री स्कुल, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक) सर्व शाळांना दिनांक १४/०७/२०२२ ते शनिवार , दिनांक १६/०७/२०२२ पर्यंत सुट्टी घोषित करणे आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पुणे,** मला शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील संदर्भ क्रं. २ नुसार, सदर परिपत्रकातील परिच्छेद क्रमांक २ मधील शासनाने प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन पुणे जिल्ह्यातील **(इंदापूर, बारामती, दौंड, शिरूर व पुरंदर हे तालुके वगळून) इतर सर्व तालुक्यातील (प्री स्कुल, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक)इयत्ता १२ वी पर्यंतच्या सर्व शाळांना गुरुवार, दिनांक १४/०७/२०२२ ते शनिवार . दिनांक १६/०७/२०२२ रोजी सुट्टी जाहीर करीत आहे.** तथापि, सदर कालावधीमध्ये शाळेतील सर्व मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यालयीन वेळेत शाळेत उपस्थित राहून स्थानिक प्रशासनाच्या आदेशानुसार आपत्ती व्यवस्थापनाचे कामकाज करणेचे आहे.

जिल्हाधिकारी पुणे

**(डॉ. राजेश देशमुख)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पुणे**

प्रत :-
१) आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी
२) आयुक्त, पिंपरी-चिंचवड, महानगरपालिका, पिंपरी, पुणे यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी
३) पोलीस आयुक्त, पुणे शहर, पुणे यांना माहितीस्तव सादर.
४) पोलीस आयुक्ती, पिंपरी चिंचवड, पिंपरी, पुणे यांना माहितीस्तव सादर.
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी
६) पोलिस अधिक्षक पुणे, ग्रामीण, पुणे यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी
७) उपविभागीय अधिकारी ---------(सर्व) यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी
८) शिक्षणाधिकारी माध्यमिक/प्राथमिक यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी
९) तालुका तहसिलदार ---------- (सर्व) यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी
१०) जिल्हा माहिती अधिकारी, पुणे यांना माहिती तथा प्रसिध्दीसाठी

Scanned with CamScanner